# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः28.01.2026** **वारःबुधवार**

---

•भारत आणि युरोपियन महासंघ  यांच्यात ऐतिहासिक मुक्त व्यापार कराराची घोषणा
•भारतीय रिझर्व्ह बँक आणि युरोपियन रोखे आणि बाजार प्राधिकरण दरम्यान सामंजस्य करार
•संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात
•भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघादरम्यानचा वीस षटकांचा चौथा सामना आज विशाखापट्टणम इथे खेळला जाणार
•आणि
•उत्तरेकडील राज्यांमध्ये थंडीची लाट येण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**व्यापारकरार**

युरोपियन महासंघ आणि भारत यांच्यातील  ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर काल नवी दिल्लीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. युरोपीय महासंघाचे अध्यक्ष आन्तोनिओ कोस्टा, युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला फॉन  देर लेयेन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात झालेल्या शिखर परिषदेनंतर हे करार करण्यात आले. युरोपियन महासंघातील सर्व २७ देशांसोबत हे करार करण्यात आले आहेत.

**व्यापार, सुरक्षा,**

संरक्षण भागीदारी, आपत्ती व्यवस्थापन तसंच हरित हायड्रोजन आदी क्षेत्रांसाठी हे करार करण्यात आले. युरोपीय देशांशी भारताने केलेल्या या कराराला 'मदर ऑफ ऑल डील' असे संबोधलं जात आहे असं पंतप्रधान म्हणाले. या करारांमुळे भारत आणि युरोपियन महासंघ यांच्यातील संबंध अधिक दृढ झाले असून, यामुळे गुंतवणुकीला चालना मिळेल, नवीन भागीदार बनतील तसंच जागतिक स्तरावर पुरवठा साखळी अधिक मजबूत होईल असं पंतप्रधानांनी म्हंटलं आहे. या करारांचा ज्या क्षेत्रांना विशेषकरून लाभ होणार आहे त्याबद्दल सांगताना पंतप्रधान म्हणाले.....

बदलत्या जागतिक परिस्थितीला तोंड देताना भारत आणि युरोपियन महासंघ हे धोरणात्मक आणि विश्वासार्ह भागीदार म्हणून एकत्र उभे आहेत हाच संदेश या करारातून दिला जात आहे असं युरोपियन महासंघाचे  अध्यक्ष आन्तोनिओ कोस्टा म्हणाले. तर, भारताच्या होत असलेल्या प्रगतीबद्दल युरोपला अतिशय आनंद होत असल्याचं युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला फॉन  देर लेयेन म्हणाल्या.

भारत आणि युरोपियन महासंघातील मुक्त व्यापार करारावरील ऐतिहासिक वाटाघाटी यशस्वीरित्या पूर्ण झाल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आनंद व्यक्त केला असून, यामुळे दोन्ही देशांतील जनतेच्या जीवनात लक्षणीय सकारात्मक बदल होतील असं म्हंटलं आहे. राष्ट्रपति भवनात काल राष्ट्रपतींनी युरोपीय महासंघाचे अध्यक्ष आन्तोनिओ कोस्टा आणि  युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला फॉन देर लेयेन यांची भेट घेतली.

दरम्यान, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी काल नवी दिल्लीत युरोपीय महासंघाचे अध्यक्ष आन्तोनिओ कोस्टा, युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला फॉन देर लेयेन यांची भेट घेतली. हा करार भारत आणि युरोपियन महासंघ यांच्यासंबंधांमधील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे, असं राधाकृष्णन यांनी समाजमाध्यमांवरील संदेशांत म्हंटलं आहे.
भारत आणि युरोपियन महासंघात झालेल्या व्यापारी कारारबद्दल गृहमंत्री अमित शहा, अश्विनी वैष्णव, पीयूष गोयल आदि  केंद्रीय मंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं आहे. हा करार आत्मनिर्भर भारताच्या राष्ट्रीय ध्येयाला बळकटी देतो असं अमित शहा यांनी म्हंटलं आहे.
केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयानं या कराराचं स्वागत केलं आहे. हा मुक्त व्यापार करार, देशाच्या वस्त्रोद्योग आणि तयार वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी एक परिवर्तनकारी करार आहे असं मंत्रालयाने म्हंटलं आहे. देशांतील अनेक व्यापारी संघटनांनी या ऐतिहासिक व्यापारी कराराचं स्वागत केलं आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कराराचं स्वागत केलं आहे. हा करार, आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य आणि शाश्वत व्यापार-नेतृत्वाखालील वाढीच्या दिशेने एक निर्णायक पाऊल असल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरील संदेशांत म्हंटलं आहे.

**<u>रिझर्व्हबँकइस्मा</u>**
भारतीय रिझर्व्ह बँक आणि युरोपियन रोखे आणि बाजार प्राधिकरण अर्थात ई.एस.एम.ए. यांच्यात आरबीआयच्या नियमन आणि पर्यवेक्षणाखालील केंद्रीय प्रतिपक्षांशी संबंधित सहकार्य आणि माहितीच्या आदान-प्रदान संबंधीचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा सामंजस्य करार, इस्माला युरोपियन महासंघाचं वित्तीय स्थैर्य जपण्यासोबतच आरबीआयच्या नियामक आणि पर्यवेक्षणसंबंधित क्रियाकलापांवर विसंबून राहण्यासाठी चौकट उपलब्ध करून देतो.

**<u>ऊर्जासप्ताह</u>**
उर्जा सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या परिषदेचं, काल,  पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दुरदृष्य प्रणालीद्वारे  उद्घाटन करण्यात आलं. देशात उर्जेची मागणी सातत्याने वाढत असून, उर्जा क्षेत्रासाठी भारतात मोठ्या संधी उपलब्ध आहेत असं पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले.

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी देशाची ऊर्जा सुरक्षा मजबूत करण्यासाठी करण्यात आलेल्या अब्जावधी डॉलर्सच्या अनेक करारांची याप्रसंगी माहिती दिली. यात, भारत पेट्रोलियम आणि ब्राझीलच्या

पेट्रोब्रास यांच्यात १२ दशलक्ष बॅरल कच्च्या तेलासाठी झालेल्या नूतनीकरण कराराचा समावेश आहे. या कराराचं अंदाजे मूल्य ७८० दशलक्ष डॉलर्स आहे.

**<u>अर्थसंकल्पअधिवेशन</u>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात होत आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाला सुरुवात होईल. उद्या आर्थिक सर्वेक्षण मांडण्यात येणार असून रविवारी, १ फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर करण्यात येईल. या अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकंदर ३० सत्रं होणार आहेत.

**<u>पंतप्रधान-छात्रसेना</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक पंतप्रधान रॅलीला संबोधित करणार आहेत. ‘राष्ट्र प्रथम – कर्तव्यनिष्ठ युवा’ अशी या वर्षीच्या रॅलीची मध्यवर्ती संकल्पना आहे. गेले महिनाभर सुरू असलेल्या शिबिराचा या रॅलीद्वारे समारोप होईल. या रॅलीत, देशभरातील 2 हजार 4 शे 6 तर, 21 देशांतील 2 शे 7 युवा आणि अधिकारी सहभागी होणार आहेत.

**<u>अंदमान-बंदरप्रकल्प</u>**

अंदमान आणि निकोबार बेटांवरील मायाबंदर इथे सुमारे २०० कोटी रुपये खर्चाचा आधुनिक आणि एकात्मिक मत्स्य बंदर प्रकल्प विकसित करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाला ‘प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने’अंतर्गत केंद्रीय निधीतून १०० टक्के अर्थसहाय्य दिलं जाईल, असं मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाने सांगितलं आहे. या बंदरात ४३० मासेमारी जहाजांसाठी सुविधा पुरवण्यात येणार असून, दरवर्षी अंदाजे 10 हजार टन मासे उतरवण्याची सोय असेल. या प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती होणार असूंन, बेकायदेशीर आणि अनधिकृत मासेमारीला आळा बसेल असं मंत्रालयाने पुढे म्हंटलं आहे.

**<u>प्रधानयूजीसी</u>**

विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीची नवीन नियमावली केवळ शैक्षणिक संस्थांमध्ये होणाऱ्या जातीय भेदभावाची समस्या दूर करण्यासाठी असून त्यांचा गैरवापर केला जाणार नाही असं आश्वासन केंद्र सरकारनं दिलं आहे. भेदभावाच्या नावाखाली त्यांचा गैरवापर केला जाणार नाही याची खबरदारी घेणं ही केंद्र, राज्य सरकार आणि यूजीसीची जबाबादारी आहे, असं शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केलं. सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या विचाराधीन असून सर्व कृती संविधानिक चौकटीतच केल्या जातील असंही प्रधान यांनी सांगितलं.

**<u>भारतपर्व</u>**

सहा दिवसीय राष्ट्रीय संस्कृती आणि पर्यटन महोत्सव 'भारत पर्व २०२६'चं काल नवी दिल्लीतील लाल किल्ल्यावर, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि केंद्रीय संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह

शेखावत यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आलं.  या महोत्सवाच्या माध्यमातून लोकांना विविध राज्यं आणि प्रदेशांच्या संस्कृतीचं दर्शन घडणार असून, हा महोत्सव, भारताचा सांस्कृतिक वारसा मजबूत करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करेल असं ओम बिर्ला उद्घाटन प्रसंगी बोलताना म्हणाले.

**<u>अजंठाचित्रपटमहोत्सव</u>**

11व्या अजंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून महाराष्ट्रातील छत्रपती सांभाजीनगर इथे सुरुवात होत आहे. विख्यात  संगीतकार आणि पद्मविभूषण पुरस्कार विजेते संगीतकार इलाई राजा यांना, भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल, 'पद्मपाणी' पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर उपस्थित राहणार आहेत. हा महोत्सव येत्या रविवारपर्यंत अर्थात 1 फेब्रुवारी पर्यंत  सुरू राहणार आहे.

**<u>क्रिकेट-19वर्षाखालील</u>**

19 वर्षांखालील क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, काल झालेल्या सामन्यात भारतीय संघाने झिम्बाब्वे संघाचा 204 धावांनी पराभव केला. या विजयामुळे  भारतानं दुसऱ्या गटाच्या गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावलं आहे. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत 50 षटकांत 3 शे 52 धावा फटकावल्या. यात विहान मल्होत्राच्या नाबाद 109 धावांचा समावेश होता. या आव्हानाचा सामना करताना झिम्बाब्वे संघ 148 धावा फटकावत 38 व्या षटकांतच गारद झाला.

**<u>क्रिकेट-भारत-न्यूझीलंड</u>**

भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघादरम्यानचा वीस षटकांचा चौथा सामना आज विशाखापट्टणम इथे खेळला जाणार आहे.  पाच सामन्याच्या मालिकेतील तीन सामने भारताने या आधीच जिंकले असल्याने भारताने मालिकेत विजयी आघाडी घेतली आहे.

**<u>हवामान</u>**

हवामान - देशाच्या उत्तरेकडील राज्यांत, विशेषतः दिल्ली, हरयाणा, चंदीगढ, हिमाचल प्रदेश आणि पंजाब या राज्यांत दाट धुक्यासह थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

काल मध्य प्रदेश तसंच महाराष्ट्राच्या काही भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे काढणीला आलेली पिकं धोक्यात येण्याची शक्यता आहे.

**याबरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**